क्रमांक परिनि-२०१८/प्र.क्र.१०३/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधि. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) तसेच कलम ९९ च्या पोट-कलम (२) चा खंड (च), पोट-कलम (३) चा खंड (च) व पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्या उप खंड (पाच) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमान्वये राष्ट्रीय सेवा योजनेमधील, राष्ट्रीय छात्रसेनेमधील विद्यार्थी परिषदेवरील क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नामनिर्देशनाशी संबंधित पुढील परिनियम विहित करीत आहे :—

सन २०१८ चा एकरुप परिनियम क्रमांक ७.

१. **संक्षिप्त नाव**.— या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (राष्ट्रीय सेवा योजनेतील, राष्ट्रीय छात्रसेनेतील, विद्यार्थी परिषदेवरील क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन) एकरूप परिनियम, २०१८, असे म्हणावे.

२. **विविध विद्यार्थी परिषदांवरील विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन**.- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. अधि. ६) यांच्या संबंधित तरतुदींन्वये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेचे किंवा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे किंवा विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम यांमधून करण्यात येणारे नामनिर्देशन हे, यात यापुढे विहित केल्याप्रमाणे मागील शैक्षणिक वर्षातील संबंधित उपक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या उच्चस्तरीय उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर कुलगुरुमार्फत करण्यात येईल :—

(१) **राष्ट्रीय सेवा योजनेमधून** :-विद्यार्थ्याने नावनोंदणीकृत स्वयंसेवक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये किमान एका वर्षाकरिता भाग घेतला असला पाहिजे आणि त्या वर्षभरात त्याची किमान १२० तास इतकी उपस्थिती असली पाहिजे आणि त्याने किमान सात

दिवसांच्या एका शिबीरास उपस्थित राहिले असले पाहिजे. अशा विद्यार्थ्याने मागील वर्षामध्ये, त्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक म्हणून प्रादेशिक किंवा राज्य किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिबिरे, स्पर्धा, संचलने आणि कोणत्याही अन्य प्रासंगिक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन अत्युच्च कामगिरी व यश संपादन केलेले असले पाहिजे.

(२) **राष्ट्रीय छात्रसेनेमधून** :- विद्यार्थ्याने, किमान एका वर्षाकरिता वरिष्ठ स्तरावरील औपचारिक राष्ट्रीय छात्रसेना प्रशिक्षण घेतेलेले असले पाहिजे आणि तो राष्ट्रीय छात्र सेनेच्या किमान ७५ टक्के संचलनांना उपस्थित राहिलेला असला पाहिजे आणि त्याने राष्ट्रीय छात्र सेनेच्या किमान एका वार्षिक प्रशिक्षण शिबिरास उपस्थित राहिलेले असले पाहिजे. अशा विद्यार्थ्याने मागील वर्षामध्ये राष्ट्रीय छात्रसेना 'बी' किंवा 'सी' प्रमाणपत्र परीक्षेमध्ये किंवा महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचा राष्ट्रीय छात्रसैनिक म्हणून प्रादेशिक किंवा राज्य किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिबिरे,स्पर्धा,संचलने आणि इतर प्रासंगिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन अत्युच्य कामगिरी व यश संपादन केलेले असले पाहिजे.

(३) **क्रीडा उपक्रमांमधून** :- विद्यार्थ्याने आंतरमहाविद्यालयीन क्रीडा महोत्सवामध्ये किमान एकदा महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केलेले असले पाहिजे. अशा विद्यार्थ्याने मागील वर्षामध्ये विद्यापीठाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या प्राधिकरणांनी आयोजित केलेले आंतरमहाविद्यालयीन किंवा आंतरक्षेत्रीय किंवा आंतर-विद्यापीठीय क्रीडा महोत्सव स्पर्धा, प्रासंगिक कार्यक्रम यांमध्ये त्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिति विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून व्यक्तिगतरित्या अथवा त्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा विद्यापीठ विभांगांचा संघ प्रतिनिधी म्हणून अत्युच्च कामगिरी व यश संपादन केलेले असले पाहिजे परंतु जर त्या महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागात, एखाद्या विवक्षित क्रीडा प्रकाराकरिता सुविधा उपलब्ध नसतील तर, वरीलप्रमाणे क्रीडा कार्यक्रमांमध्ये सहभागी होणारा विद्यार्थी, जरी तो त्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचे प्रतिनिधीत्व करीत नसेल तरी, तो अशा नामनिर्देशनासाठी पात्र असल्याचे मानण्यात येईल.

(४) **सांस्कृतिक उपक्रमांमधून** :- विद्यार्थ्याने, मागील वर्षामध्ये महाविद्यालयीन किंवा आंतरक्षेत्रीय किंवा आंतर-विद्यापीठीय किंवा राज्य वा राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही प्राधिकरणांनी आयोजित केलेल्या, नृत्य, नाट्य, संगीत, वक्तृत्व, वादविवाद, साहित्य, ललित कला,यांसारख्या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये व प्रासंगिक कार्यक्रमांमध्ये (युवकमहोत्सव, इंद्रधुनष्य, राज्य किंवा राष्ट्रीय युवक महोत्सव यांसारखे कार्यक्रम) त्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिती विद्यापीठ विभागाचे प्रतिनिधी म्हणून व्यक्तिगतरित्या किंवा त्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा यथास्थिती, विद्यापीठ विभागाचा संघ प्रतिनिधी म्हणून अत्युच्च कामगिरी किंवा यश संपादन केलेले असले पाहिजे.

३. नामनिर्देशित करावयाचे विद्यार्थी हे मागील वर्षामध्ये कोणत्याही अनुशेषाशिवाय किंवा सत्र पुढे चालू ठेवण्याच्या अनुमतीचा (एटीकेटीचा) लाभ न घेता सर्व प्रमुख विषय उत्तीर्ण झालेले असले पाहिजेत.

४. विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. अधि. ६) याच्या संबद्ध तरतुदींन्वये, संचालक, विद्यार्थी विकास याच्याशी विचारविनिमय करून, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी अशा विद्यार्थ्यांना नामनिर्देशित करील. या प्रयोजनार्थ, सर्व महाविद्यालयांतील, परिसंस्थेतील व विद्यापीठ विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या, राष्ट्रीय छात्र सेनेच्या, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांच्या नामनिर्देशित केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठामध्ये एकत्रित करण्यात येईल आणि त्यानंतर त्या प्रवर्गातील अत्युच्च कामगिरी व यश संपादन केलेल्या विद्यार्थ्याला नामनिर्देशित करण्यात येईल.

५. नामनिर्देशित करताना, अत्युच्च कामगिरी किंवा यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या समान झाली असेल अशा बाबतीत, मागील वर्षामध्ये परीक्षेत उच्चतर गुण, टक्केवारी, किंवा यथास्थिती, श्रेणी ज्या उमेदवाराने मिळवलेली असेल त्या उमेदवारास नामनिर्देशनासाठी प्राधान्य देण्यात येईल, आणि जर त्यानंतरही ती संख्या समान राहत असेल तर, मागील वर्षात उच्च शैक्षणिक कामगिरी केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

द. रा. कहार,

शासनाचे उप सचिव.

HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 26th October 2018.

NOTIFICATION

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. PARINI- 2018/C. R. No. 103/VISHI-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with clause (*f*) of sub-section (*2*), clause (*f*) of sub-section (*3*) and sub-clause (v)of clause (b) of sub-section (*4*) of section 99 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the following Uniform Statute relating to nomination of students from National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities on Students' Council, namely :—

UNIFORM STATUTE NO. 7 OF 2018.

1. Short title.—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Nomination of students from National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities on Students' Council) Uniform Statute, 2018.

2. *Nomination of students on Students Council* :— The nomination from National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural Activities to University Department Students' Council/ College Students' Council / University Students' Council shall be done by the Vice Chancellor on the basis of outstanding performance of the highest level by a student in the respective activities in the preceding academic year as prescribed herein below –

(1) *From National Service Scheme* :—The student shall have participated for at least one year in the National Service Scheme programme as enrolled volunteer and shall have attended minimum 120 hours of work in the year and attended at least one camp of minimum seven days duration. Such student shall have the highest level of performance/achievement in the participation of camps, competitions, parades and any other event at Regional / State / National / International level as National Service Scheme volunteer of the college or institution or University Department, as the case may be, in the preceding year.

(2) *From National Cadet Corps* :—The student shall have undergone formal NCC training in Senior Division for at least one year and shall have attended at least 75% of NCC parades and shall have attended at least one NCC Annual Training Camp (ATC). Such student shall have the highest level of performance/ achievement in the NCC 'B' / 'C' certificate examination and/or in the participation of camps, competitions, parades and other event at Regional / State / National / International level as NCC Cadet of the college or institution or University Department, as the case may be in the preceding year.

(3) *From Sports* :—The student shall have represented the college in the inter-collegiate tournaments at least once. Such student shall have the highest level of performance/achievement as the individual or team representative of the College/ institution /University Departments in the sports tournaments, competitions, events at the inter-collegiate / inter-zone / inter-university sports tournaments organized by the university or Association of Indian Universities or the State or Central Government authorities as the representatives of the college or institution or University, as the case may be, in the preceding year :

Provided that, in case of non-availability of the facilities at the college or institution or University Department, as the case may be for a particular type of sports, a student participating in the sports event as above shall be considered eligible for such nomination, even if he is not representing the college or institution or University Department, as the case may be.

(4) *From Cultural Activities* :—A student shall have the highest level of performance/achievement as an individual or team representative of college or institution or University Department, as the case may be, in the cultural competitions and events such as dance, drama, music, elocution, debate,

literature, fine arts, etc. organized by the University or Association of Indian Universities or any State or Central Government Authorities (events like – youth festival, *Indradhanushya,* State or National youth festival) at the inter-collegiate or inter-zone or inter-university or State or National or International level as the representatives of the college or institution or University Department, as the case may be, in the preceding year.

3. The student to be nominated shall have cleared all heads of passing in the preceding year without any backlog and / or benefit of ATKT.

4. The President of University Students' Council shall nominate such students to University Students' Council in consultation with Director of Students' Development. For this purpose, the list of nominated students of N.S.S., N.C.C., Sports and Cultural Activities of all colleges, institutions and University Departments shall be collected at the University and therefrom the student with highest level of performance/ achievement in that category shall be nominated.

5. While making the nominations, in case of equality of the highest performance/achievement, the candidate of higher class in the preceding year shall be given preference in nomination and if equality persists even thereafter, the candidate with higher academic performance in the preceding year shall be given preference.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. KAHAR,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHBIL /2009/37831

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३८(२)] शुक्रवार, ऑक्टोबर २६, २०१८/कार्तिक ४, शके १९४० [पृष्ठे २६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३९३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर २०१८

आदेश

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.

क्रमांक परिनि-२०१८/प्र.क्र.८१/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ९९ च्या पोट-कलम (११) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांच्या संबंधात निवडणुका घेण्याची कार्यपद्धती, निवडणूक घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुका घेण्यासाठीची यंत्रणा, उमेदवार आणि निवडणूक प्रशासक यांच्याकरिता आचारसंहिता, आणि तक्रार निवारण यंत्रणा यांकरिता पुढीलप्रमाणे विनिर्देश करीत आहे :–

१. **संक्षिप्त नाव व व्याप्ती .**— (१) या आदेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत निवडणुका घेण्याची कार्यपद्धती, निवडणुका घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुका घेण्यासाठीची यंत्रणा, उमेदवार आणि निवडणूक प्रशासन यांच्याकरिता आचारसंहिता आणि तक्रार निवारण यंत्रणा) आदेश, २०१८, असे म्हणावे.

(२) हा आदेश २९ ऑक्टोबर २०१८ रोजी अंमलात येईल.

२. **व्याख्या.**– (१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा- ६) असा आहे ;

(ख) "वर्ग" याचा अर्थ, विशिष्ट वर्षासाठी असलेल्या पूर्णवेळ पाठ्यक्रमाच्या प्रत्येक तुकडीच्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश असणारा एक गट, असा आहे ;

(ग) "महाविद्यालय विद्यार्थी परिषद" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (३) च्या तरतुदींनुसार घटित केलेली महाविद्यालय विद्यार्थी परिषद, असा आहे ;

(घ) "निरंतर उमेदवार" याचा अर्थ, मत मोजणीच्या कोणत्याही दिलेल्या टप्प्यावर मतदानामधून निवडलेला नाही किंवा वगळलेला नाही असा कोणताही उमेदवार, असा आहे ;

(ङ) "मोजणी" याचा अर्थ, उमेदवारांकरिता नोंदवलेल्या पहिल्या पसंतीच्या मोजणीमध्ये अंतर्भूत असलेली सर्व कार्ये ; किंवा निर्वाचित उमेदवाराची अधिकची मते हस्तांतरित करण्यात अंतर्भूत असलेली सर्व कार्ये, किंवा वगळलेल्या उमेदवाराची किंवा एकत्रितपणे वगळलेल्या दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांची मते हस्तांतरित करण्यात अंतर्भूत असलेली सर्व कार्ये असा आहे ;

(च) महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या संदर्भात "निवडणूक अधिकारी" याचा अर्थ, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी किंवा मान्यताप्राप्त संस्थेच्या संचालकाने नामनिर्देशित केलेला अध्यापक आणि विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेच्या व विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या संदर्भात, विद्यार्थी विकास संचालकाने नामनिर्देशित केलेला अध्यापक, असा आहे ;

(छ) "निवडणूक कार्यक्रम" याचा अर्थ, निवडणुकीच्या कार्यक्रमाचे दिनांकनिहाय वेळापत्रक, असा आहे व त्यात कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक, नामनिर्देशन भरण्याचा दिनांक, नामनिर्देशन मागे घेण्याचा दिनांक, निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची यादी प्रदर्शित करण्याचा दिनांक, निवडणुकीचा दिनांक, मतमोजणीचा दिनांक आणि निकाल घोषित करण्याचा दिनांक आणि निवडणूक अधिकाऱ्याने तयार केलेला आणि प्रसिद्ध केलेला असा इतर तपशील, याचा समावेश असेल ;

(ज) "पहिला पसंतीक्रम" याचा अर्थ, मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोर केवळ अंक "१" नमूद करणे असा आहे, "दुसरा पसंतीक्रम" याचा अर्थ, मतपत्रिकेवर अंक "१" च्या नंतर येणाऱ्या उमेदवाराच्या नावासमोर केवळ अंक "२" नमूद करणे, असा आहे "तिसरा पसंतीक्रम" याचा अर्थ, मतपत्रिकेवर नावासमोर अंक "१" आणि अंक "२" च्या नंतर केवळ अंक "३" नमूद करणे, असा आहे ;

(झ) "पूर्णवेळ पाठ्यक्रम" याचा अर्थ, विद्यापीठाने मान्यता दिलेला पदवी किंवा पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम, असा आहे, पण त्यात इतर कोणताही प्रमाणपत्र / पदविका पाठ्यक्रम, जोड पाठ्यक्रम, दूरस्थ पद्धती/बाह्य पद्धतीमधील कोणताही शैक्षणिक अध्ययनक्रम आणि महाविद्यालयाने किंवा संस्थेने किंवा विद्यापीठ विभागाने दिलेला इतर कोणताही स्वायत्त पाठ्यक्रम यांचा समावेश असणार नाही ;

(ञ) "पुढील उपलब्ध पसंतीक्रम" याचा अर्थ, निरंतर उमेदवारासाठी सलग संख्याक्रमामध्ये नोंदविलेला दुसरा किंवा त्यानंतरचा पसंतीक्रम, असा आहे; यापूर्वीच निवडून आलेल्या किंवा वगळलेल्या उमेदवारांकरिता मतपत्रिकेवर क्रमाने लगतचे, पसंतीक्रम हिशेबात घेतले जाणार नाहीत ;

(ट) "अहस्तांतरणीय पत्रिका" याचा अर्थ, ज्या मतपत्रिकेवर निरंतर उमेदवारासाठी दुसरा किंवा त्यानंतरचा पसंतीक्रम नोंदविलेला नाही किंवा दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांची नावे (मग ती निरंतर असो किंवा नसो) समान क्रमांकाने चिन्हांकित केली आहेत आणि पसंतीक्रम लगतचा आहे; किंवा लगतचा पसंतीक्रम नोंदवलेल्या उमेदवाराचे नाव (मग ती निरंतर असो किंवा नसो) मतपत्रिकेवर इतर कोणत्याही क्रमांकानंतर सलगपणे नसलेल्या क्रमांकाने चिन्हांकित केला आहे ; किंवा दोन किंवा अधिक क्रमांकाने चिन्हांकित केले आहे किंवा इतर कोणत्याही कारणाकरिता निरंतर उमेदवाराकरिता मतदाराने नोंदवलेला पुढील उपलब्ध पसंतीक्रम निर्धारित केला जाऊ शकत नाही, अशी मतपत्रिका, असा आहे ;

(ठ) कोणत्याही उमेदवाराबाबतीत "मूळ मत" याचा अर्थ, ज्या मतपत्रिकेवर त्या उमेदवारासाठी पहिला पसंतीक्रम नोंदविला आहे त्या मतपत्रिकेतून प्राप्त झालेले मत, असा आहे ;

(ड) निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा) याचा अर्थ, त्या निवडणुकीत भरावयाची रिक्त पदांची संख्या अधिक एक याने निवडणुकीत मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येस भागून येणारे उत्तर अधिक एक या सूत्रानुसार निर्धारित केलेली उमेदवारास निवडून येण्यासाठी आवश्यक मतसंख्या, असा आहे आणि अशाप्रकारे आलेल्या निकालातील अपूर्णांक वगळण्यात येईल,

उदाहरणार्थ :–

$$\text{निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा)} = \frac{\text{वैध मतांची एकूण संख्या}}{\text{रिक्त पदांची संख्या} + १} + १$$

उदाहरण :– रिक्त पदांची संख्या = ५

वैध मते = १००

$$\text{निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या (कोटा)} = \frac{१००}{५+१} + १$$

$$= १६.६७ + १$$

$$= १७$$

(१७.६७ हा १८ अशा पूर्णांकात घेण्यात येणार नाही. कारण अगोदरच तो १६.६७ मध्ये "१" मिळवला आहे) ;

(ढ) "अधिकची मते" याचा अर्थ, कोणत्याही उमेदवाराला मिळालेल्या मूळ व हस्तांतरित मतांची एकूण संख्या ही निवडून येण्यासाठी आवश्यक असलेल्या (कोटा) मतांच्या संख्येपेक्षा अधिक होत असेल अशी मतांची संख्या, असा आहे ;

(ण) "हस्तांतरित करावयाची मतपत्रिका" याचा अर्थ, निरंतर उमेदवाराकरिता लागोपाठच्या संख्याक्रमानुसार पहिला, दुसरा किंवा त्यानंतरचा लागोपाठचा पसंतीक्रम नोंदवलेली मतपत्रिका, असा आहे ;

(त) कोणत्याही उमेदवाराच्या बाबतीत "हस्तांतरित मत" याचा अर्थ, त्या उमेदवारासाठी दुसऱ्या किंवा लागोपाठच्या पसंतीक्रमाची नोंदणी केलेल्या अशा मतपत्रिकांतून प्राप्त झालेली मते, असा आहे ;

(थ) "विद्यापीठ विद्यार्थी संघ" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (४) (क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घटित केलेला विद्यापीठ विद्यार्थी संघ, असा आहे ;

(द) "विद्यापीठ विद्यार्थी परिषद" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (४) (ख) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घटित केलेली विद्यापीठ विद्यार्थी परिषद, असा आहे ;

(ध) "विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९९ (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे घटित केलेली विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद, असा आहे.

(२) या आदेशात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या अधिनियमात त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील, तेच अर्थ असतील.

३. **विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीकरिता प्राधिकरण.**— (१) महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त संस्थेचा संचालक हा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीकरिता प्राधिकारी असेल.

(२) संचालक, विद्यार्थी विकास हा विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद यांचा निवडणुकीचा प्राधिकारी असेल.

४. **मतांची वैधता आणि निवडणुकीचा निकाल यासंबंधात निर्णय घेण्याचे निवडणूक अधिकाऱ्याचे अधिकार.**—(१) निवडणूक अधिकाऱ्याला, संदिग्धता वाटत असेल त्याबाबतीत, नोंदवलेल्या मताची वैधता किंवा अवैधता याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

(२) निवडणूक अधिकाऱ्याला प्रत्येक निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याचा अधिकार असेल.

५. **निवडणूक कार्यक्रम.**— (१) संचालक, विद्यार्थी विकास,–

(एक) कुलगुरुबरोबर विचारविनिमय करून निवडणूक कार्यक्रम तयार करील. निवडणूक कार्यक्रमामध्ये निवडणुका घेणे, अधिसूचना काढणे, प्रसिद्धी आणि निवेदने यासंबंधातील सर्व कार्यक्रमांच्या सविस्तर वेळापत्रकाचा अंतर्भाव असेल आणि तो संबंधित शैक्षणिक वर्षाच्या ३१ जुलै रोजी किंवा त्यापूर्वी घोषित करण्यात येईल ;

(दोन) शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी किंवा त्यापूर्वी विद्यापीठ विद्यार्थी परिषद घटित करण्यात येईल, याची खात्री करील.

(तीन) कुलगुरूंशी विचारविनियम केल्यानंतर, अधिनियमाच्या कलम ९९ (३) (घ) अन्वये आवश्यकता असल्याप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाकरिता आरक्षणाचा प्रवर्ग चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्याची प्रक्रिया हाती घेईल आणि या प्रक्रियेची निष्पत्ति, निवडणूक कार्यक्रमाबरोबरच प्रत्येक महाविद्यालयासाठीच्या आरक्षणाच्या प्रवर्गाच्या सूचीच्या स्वरूपात घोषित करण्यात येईल.

(२) सर्व महाविद्यालये किंवा परिसंस्था किंवा विद्यापीठ विभाग यांमध्ये निवडणूक त्याच कार्यालयीन दिवशी घेण्यात येत आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी, विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद व महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांच्या निवडणुका घेण्यासाठी एक सामाईक वेळापत्रक असेल.

(३) यथोचितरीत्या घटित केलेल्या विद्यापीठ विद्यार्थी संघाचा (म्हणजे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठीचा निर्वाचक गण) अधिकृत प्रसिद्धीचा दिनांक आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषदेची निवडणूक दिनांक यादरम्यान किमान पूर्ण दहा दिवसांचे अंतर असेल.

६. **निवडणूक लढविण्याकरिता पात्रता.**– (१) उमेदवार हा, ज्याने महाविद्यालयाने किंवा परिसंस्थेने किंवा विद्यापीठ विभागाने देऊ केलेल्या, विद्यापीठाच्या पूर्णवेळ मान्यताप्राप्त पाठ्यक्रमासाठी शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेली आहे व प्रवेश घेतलेला आहे असा पूर्णवेळ नियमित विद्यार्थी असावा.

(२) उमेदवाराने, मागील कोणताही विषय शिल्लक न ठेवता आणि / किंवा सत्र पुढे चालू ठेवण्याची मुभा (एटीकेटी) न घेता अगोदरच्या वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण केलेले असले पाहिजेत.

(३) विद्यार्थी हा, एकाच वर्गात पुनः प्रवेश घेतलेला विद्यार्थी नसावा.

(४) निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ही, त्या शैक्षणिक वर्षाच्या ३० सप्टेंबर रोजी त्यांच्या वयाची पंचवीस वर्षे पूर्ण, एवढी असावी.

(५) राखीव प्रवर्गाच्या प्रतिनिधीसाठी निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराकडे निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

७. **निवडणूक लढविण्यासाठी अनर्हता.**—जर एखाद्या विद्यार्थ्याने,—

(१) उच्च शिक्षणासाठी पहिल्यांदा प्रवेश घेतल्यापासून सात शैक्षणिक वर्षे पूर्ण केलेली असतील; किंवा

(२) त्यास कोणत्याही विद्यापीठ परीक्षेतील गैरप्रकारामध्ये गुंतल्यामुळे किंवा कोणतीही गैरवर्तणूक केल्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याने शिक्षा केलेली असेल ; किंवा

(३) त्यास नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाकरिता दोषी ठरविलेले असेल,—

तर तो विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास हक्कदार असणार नाही.

८. **निवडणुकीची प्रक्रिया.**–(१) महाविद्यालय किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, अध्यापकास त्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या अनुक्रमे प्राचार्याद्वारे किंवा संचालकाद्वारे निवडणूक अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात येईल. विद्यापीठाच्या बाबतीत, प्र-कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर संचालक, विद्यार्थी विकास याच्याकडून निवडणूक अधिकारी म्हणून अध्यापकास नामनिर्देशित करण्यात यईल. निवडणूक अधिकारी, वर्गप्रतिनिधी निवडण्यासाठी प्रत्येक वर्गाकरिताचा निर्वाचक गण आणि संबंधित विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी, राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी निवडण्यासाठी त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा अंतर्भाव असणारा विद्यार्थी निर्वाचक गण यांची तात्पुरती व अंतिम सूची तयार करील व प्रसिद्ध करील. अशा मतदार यादीची एक प्रत विद्यापीठाच्या, महाविद्यालयाच्या किंवा यथास्थिति, परिसंस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. अशा मतदार यादीची छापील प्रत देखील उमेदवारांना वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्यात येईल.

(२) मतदान मतपत्रिकेद्वारे होईल. मतपत्रिकेवर आडनावांनी सुरू होणारी उमेदवारांची नावे इंग्रजी वर्णानुक्रमाने नमूद करण्यात येतील.

(३) वर्ग प्रतिनिधि व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेला, किंवा, यथास्थिति, महाविद्यालय विद्यार्थी परिषदेला निवडून द्यावयाचे अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यांकरिता वेगळ्या मतपेट्या असतील.

(४) विद्यार्थ्याला, संबंधित वर्ग प्रतिनिधी व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेला किंवा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेला निवडून द्यावयाचा अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यासाठी स्वतंत्रपणे मत देण्याचा हक्क असेल, म्हणजेच विद्यार्थ्याला एकूण कमाल पाच मते देण्याचा हक्क असेल.

(५) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेसाठीची व महाविद्यालय विद्यार्थी परिषदेसाठीची निवडणूक, सरळ बहुमताच्या तत्त्वानुसार घेण्यात येईल.

(६) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठीची निवडणूक, एकल हस्तांतरणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार घेण्यात येईल. प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल.

(एक) मतदार त्याचे मत नोंदवताना –

(क) 'पसंतीक्रम' या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करील त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक " १ " नमूद करील ;

(ख) याशिवाय, त्याला जेवढ्या अन्य उमेदवारांना मत द्यायचे असेल त्यांच्या संबंधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक " २ ", " ३ ", " ४ " असे सलग अंक नमूद करून दर्शवेल ;

(ग) त्याच्या मतपत्रिकेवर त्याचे सर्व पसंतीक्रम एकतर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत नमूद करील;

(घ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करणार नाही.

(दोन) मतपत्रिका जर,–

(क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारी केवळ अंक " १ " दर्शवण्यात आला नसेल, किंवा

(ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक " १ " एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आला असेल; किंवा

(ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक "१" व काही अन्य एकाच उमेदवाराच्या नावासमोर दर्शवण्यात आले असतील; किंवा

(घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील, किंवा

(ङ) प्रथम पसंतीक्रम नोंदवण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल; किंवा

(च) मतदाराने निवडणुकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल; किंवा

(छ) निळ्या शाई खेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल;

(ज) मतदारांची पसंती दर्शविणाऱ्या अंकांमध्ये कोणतीही खोडाखोड, गिरवणे किंवा फेरफार केला असेल,—

तर अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

(तीन) एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात आलेला पुढील पसंतीक्रम असलेली वैध मतपत्रिका, अशा लगतनंतरच्या पसंतीक्रमासाठी अवैध ठरेल.

(७) संचालक, विद्यार्थी विकास हा, विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांची यादी तयार करील व ती प्रसिद्ध करील, जी विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव वर्गाचे प्रतिनिधी निवडून आणण्यासाठीचा निर्वाचक गण असेल.

(८) निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेला विद्यार्थी, या आदेशासोबत जोडलेल्या, नमुना " अ " मधील नामनिर्देशनपत्र, प्रत्येक नामनिर्देशन नमुन्यामागे रुपये ५० एवढ्या ना-परतावा शुल्कासह सादर करील.

(९) एखाद्या उमेदवारास एका वेळी एकापेक्षा जास्त पदांसाठी निवडणूक लढवता येणार नाही.

(१०) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या कोणत्याही सदस्यास विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष, सचिव या पदांसाठी निवडणूक लढवता येईल.

(११) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या कोणत्याही महिला प्रतिनिधीला, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या महिला प्रतिनिधीच्या पदासाठी निवडणूक लढवता येईल.

(१२) अधिनियमाच्या कलम ९९ (४) (ख)(चार) अनुसार, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेकरिता अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागास वर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यातील प्रतिनिधींसाठीचे आवर्तन विद्यापीठाकडून ठरविण्यात आणि आगाऊ घोषित करण्यात येईल. जो विद्यापीठ विद्यार्थी संघाचा सदस्य असेल अशा, या प्रवर्गाचा कोणत्याही उमेदवारास त्या त्या राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी म्हणून, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेची निवडणूक लढवता येईल.

(१३) प्रत्येक संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, हे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचे मतदान केंद्र असेल, जेथे अशा संलग्न महाविद्यालयाचे किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्थेचे विद्यार्थी असतील असे, विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सदस्य मतदान करतील. निवडणूक अधिकारी, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीच्या प्रत्येक मतदान केंद्राकरिता मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करील. हा मतदान अधिकारी, असे मतदान केंद्र ज्या जिल्ह्यात स्थित असेल त्या जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यामधील असेल. जेथे असे मतदान केंद्र स्थापन करण्यात आले असेल असे महाविद्यालय किंवा परिसंस्था, आवश्यक त्या सुविधा व सहाय्य पुरवील.

(१४) निवडणूक अधिकाऱ्याने घोषित करावयाचा प्रत्यक्ष मतदानाचा कालखंड सलग चार तास इतका असावा.

(१५) निवडणूक अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्रातील मतदारांची यादी जाहीर करील, केवळ त्याच मतदान केंद्रात त्यांचा मतदानाचा हक्क बजवावयाचा असेल.

(१६) मतदान प्रक्रिया समाप्त झाल्यानंतर मोहोरबंद पेट्या संबंधित अभिलेखासह तात्काळ विद्यापीठात नेण्यात येतील.

(१७) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांच्या निवडणुकीच्या बाबतीत मतमोजणी आणि निकालाची घोषणा मतदानाच्या दिवशीच करण्यात येईल.

(१८) मतदानाच्या वेळी, प्रत्येक मतदाराकडे महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचे वैध ओळखपत्र असणे आवश्यक आहे. निर्वाचित अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी यांना, विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठ विभागाच्या निवडणूक अधिकाऱ्याकडून विशेष ओळखपत्र देण्यात येईल. कोणत्याही मतदारास वैध ओळखपत्र असल्याखेरीज मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(१९) **मतपत्रिकांची छाननी.**—(एक) निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली अशी इतर कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्ती यांच्याकडून सर्व मतपत्रिकांची छाननी करण्यात येईल. निवडणूक अधिकारी हा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही व्यक्तींना मतपत्रिकांची छाननी आणि मतमोजणीच्या संबंधात त्याचे अधिकार सुपूर्द करील.

(दोन) उमेदवार, किंवा जो विशिष्ट मतदार संघाचा मतदार असेल आणि लिखित स्वरूपात यथोचितरीत्या त्याच्यावतीने प्राधिकृत केलेला असेल, असा त्याचा प्रतिनिधी अशा छाननीस हजर राहण्यास हक्कदार असेल.

(तीन) जेव्हा, एकापेक्षा जास्त मतदान केंद्रे असतील तेव्हा, सर्व मतदान केंद्रांतील मतपत्रिका प्रथम एकत्र करण्यात येतील आणि त्यानंतर निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्ती त्यांची छाननी करतील.

(२०) **मतपत्रिकांची मोजणी.**—(एक) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीसाठीची मतमोजणी, मतदानाच्या तिसऱ्या दिवशी सुरू करण्यात येईल आणि मतमोजणीच्या सलग प्रक्रियेनंतर निकाल घोषित करण्यात येईल.

(दोन) निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्ती , हे निर्वाचक मंडळाच्या मतपत्रिकांची छाननी आणि मोजणी केल्यानंतर मतपत्रिकांची तपासणी करील आणि प्रत्येक उमेदवारासाठी नोंदविण्यात आलेल्या पहिल्या पसंतीक्रमानुसार आणि अवैध ठरलेल्या मतपत्रिका नाकारून गठ्ठ्यामध्ये त्यांची विभागणी करील.

(तीन) निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्ती, प्रत्येक गठ्ठ्यातील मतपत्रिकांची संख्या मोजेल आणि अशा उमेदवारासाठी प्रथम पसंतीक्रम नोंदवलेल्या वैध मतपत्रिकांच्या संख्येइतकी मते प्रत्येक मतदारास देईल. निवडणूक अधिकारी वैध मतपत्रिकांच्या एकूण संख्येसंबंधी माहिती संकलित करील आणि आवश्यक मते (कोटा) निर्धारित करील.

(चार) उमेदवार किंवा जो विशिष्ट निर्वाचक गणाचा मतदार असेल आणि लिखित स्वरूपात यथोचितरीत्या त्याच्यावतीने /त्याने प्राधिकृत केलेला असेल असा त्याचा प्रतिनिधी यांनाच केवळ मतमोजणीच्या वेळी हजर राहण्यास परवानगी देण्यात येईल. उमेदवार किंवा त्याचा प्राधिकृत केलेला प्रतिनिधी आणि निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्यक्ती यांच्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीच्या ठिकाणापासून पुरेशा अंतराच्या परिघाच्या आत येण्यास अनुमती देण्यात येणार नाही.

(पाच) मतमोजणीच्या कोणत्याही फेरी अखेर, ज्या उमेदवाराकडे असलेल्या मतांची संख्या ही, आवश्यक मतां इतकी (कोटा) किंवा त्यापेक्षा जास्त असेल, त्या उमेदवारास त्यानंतर विजयी घोषित करण्यात येईल.

(सहा) मतमोजणीच्या कोणत्याही फेरीच्या शेवटी, उमेदवारास निवडून येण्यासाठी आवश्यक असलेल्या मतांपेक्षा मिळालेली अधिकची मते, या आदेशातील तरतुदीनुसार निवडून आलेल्या उमेदवाराच्या शेवटच्या गठ्ठ्यातील किंवा उपगठ्ठ्यातील मतपत्रिकांवर नोंदवण्यात आलेला पुढील उपलब्ध पसंतीक्रम ज्या निरंतर उमेदवारांना देण्यात आला असेल, त्यांना हस्तांतरित करण्यात येतील.

(सात) जर एकाहून अधिक उमेदवारांना अधिकची मते मिळाली असल्यास, ज्याला जास्त अधिकची मते मिळाली असतील त्याचा पहिल्यांदा विचार करण्यात येईल. जर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान अधिकची मते मिळाली असल्यास, त्यातील ज्या उमेदवारास मतमोजणीच्या पहिल्या फेरीत– जिच्यामध्ये त्या उमेदवारांची मते असमान असतील त्या फेरीत– जास्त मते मिळाली असतील, त्या उमेदवाराच्या अधिकच्या मतांचा आधी विचार करण्यात येईल. अशा उमदेवारांना सर्व फेऱ्यांमध्ये समान मते जेव्हा मिळाली असतील त्यावेळी, चिठ्ठ्या टाकून अधिकची मते हस्तांतरित करण्याबाबतचा निर्णय निवडणूक अधिकारी घेईल.

(आठ) निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती किंवा केलेल्या व्यक्ती, अधिकची मते हस्तांतरित करणार नाहीत,जेव्हा हस्तांतरित न केलेली अन्य कोणतीही अधिकची मते मिळून ती अधिकची मते,—

(क) निवडणुकीत सर्वात कमी मते मिळालेला उमेदवार आणि त्यापुढील जास्त मते मिळालेला लगतचा उमेदवार यांच्या मतातील फरकापेक्षा कमी असतील, किंवा

(ख) निवडणुकीत सर्वात कमी मते असलेल्या दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांची मते आणि त्या पुढील जास्त मते मिळालेल्या लगतच्या उमेदवाराची मते यांच्या बेरजेमधील फरकापेक्षा कमी असतील:

परंतु, उपरोक्त दोन किंवा त्याहून अधिक, सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवारांना वगळण्यात आल्यामुळे, निरंतर उमेदवारांची संख्या ही, भरावयाच्या रिक्त जागांच्या संख्येपेक्षा कमी होणार नाही.

(नऊ) (क) जर निवडून आलेल्या उमेदवाराच्या मतांमध्ये केवळ मूळ मतांचा समावेश असेल तर, निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली किंवा केलेल्या व्यक्ती निवडून आलेल्या ज्या उमेदवाराची अधिकची मते हस्तांतरित करायची असतील अशा उमेदवाराच्या गठ्ठ्यातील सर्व मतपत्रिकांची तपासणी करतील.

(ख) जर निवडून आलेल्या उमेदवाराच्या मतांमध्ये मूळ मते आणि हस्तांतरित मते किंवा केवळ हस्तांतरित मते यांचा समावेश असेल तर, निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली किंवा केलेल्या व्यक्ती, निवडून आलेल्या ज्या उमेदवाराची अधिकची मते हस्तांतरित करावयाची असतील, अशा उमेदवाराच्या शेवटच्या उपगठ्ठ्यातील मतपत्रिकांची तपासणी करतील.

(ग) वरील दोन्ही बाबतींत, निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती किंवा केलेल्या व्यक्ती, त्या मतपत्रिकांवर नोंदवलेल्या पुढील उपलब्ध पसंतीक्रमानुसार हस्तांतरणीय मतपत्रिकांची उपगठ्ठ्यांमध्ये विभागणी करतील आणि अहस्तांतरणीय मतपत्रिकांचा स्वतंत्र उपगठ्ठा तयार करील आणि हस्तांतरणीय मतपत्रिकांच्या प्रत्येक उपगठ्ठ्यातील मतपत्रिकांची संख्या सुनिश्चित करतील.

(दहा) जर हस्तांतरणीय मतपत्रिकांच्या उपगठ्ठ्यांतील मतपत्रिकांची एकूण संख्या अधिकच्या मतांएवढी किंवा त्यापेक्षा कमी असेल तर, निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली वा केलेल्या व्यक्ती, हस्तांतरणीय मतपत्रिकांच्या प्रत्येक उपगठ्ठ्यातील सर्व मतपत्रिका, त्यांवर नमूद केलेल्या पुढील पसंतीक्रमानुसार निरंतर उमेदवाराकडे हस्तांतरित करतील आणि निर्वाचित उमेदवारांच्या आवश्यक मतांसाठी गरजेचा नसलेला असा, अहस्तांतरणीय मतपत्रिकांचा तेवढ्या संख्येचा स्वतंत्र गठ्ठा म्हणून बाजूला ठेवतील. बाजूला ठेवण्यात आलेल्या त्या विशिष्ट मतपत्रिका या, अहस्तांतरणीय मतपत्रिकांच्या गठ्ठ्यामध्ये शेवटी अंतर्भूत केलेल्या मतपत्रिका असतील.

(अकरा) जर हस्तांतरणीय मतपत्रिकांची एकूण संख्या अधिकच्या मतांपेक्षा जास्त असेल तर, निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली किंवा केलेल्या व्यक्ती, पुढील उपलब्ध पसंतीक्रमानुसार निरंतर उमेदवारास, अधिकच्या मतांचे हस्तांतरणीय मतपत्रिकांच्या एकूण संख्येशी असलेल्या प्रमाणात उपगठ्ठ्यातील मतपत्रिकांच्या संख्येएवढ्या मतपत्रिका हस्तांतरित करतील.

(बारा) प्रत्येक उपगठ्ठ्यातून हस्तांतरित करावयाच्या मतपत्रिकांच्या संख्येची निश्चिती, उपगठ्ठ्यातील मतपत्रिकांच्या संख्येस अधिकच्या मतांनी गुणून व निकालास वैध हस्तांतरणीय मतपत्रिकांच्या एकूण संख्येने भागून करण्यात येईल.

समीकरण–

मतांचे मूल्य = अधिकच्या मतांची एकूण संख्या X विशिष्ट उमेदवारास हस्तांतरित केलेल्या मतपत्रिकांची प्रत्यक्ष संख्या / वैध हस्तांतरणीय मतपत्रिकांची एकूण संख्या

अशाप्रकारे सुनिश्चित केलेल्या प्रत्येक संख्येतील अपूर्णांकाच्या भागाची, असल्यास, नोंद घेण्यात येईल. अशा अपूर्णांकांच्या भागांमुळे हस्तांतरणीय मतपत्रिकांची संख्या अधिकच्या मतांहून कमी असेल तर, हस्तांतरित करावयाच्या मतपत्रिकांची जेवढी एकूण

संख्या अधिकच्या मतांच्या संख्येशी समान करणे आवश्यक असेल तेवढेच अपूर्णांकाचे भाग त्याच्या परिमाणाच्या क्रमानुसार घेऊन मोठ्या संख्येकडून सुरुवात करून, पूर्ण एकाचे मूल्य म्हणून त्याची गणना करण्यात येईल आणि अपूर्णांकाचा उर्वरित भाग विचारात घेतला जाणार नाही. दोन किंवा अधिक अपूर्णांकाचे भाग समान परिमाणाचे असल्यास, जो अपूर्णांकभाग सर्वात मोठ्या उपगठ्ठयातून उद्भवला आहे, तो, सर्वात मोठा असल्याचे मानण्यात येईल आणि संबंधित उपगठ्ठयांतील मतपत्रिका संख्येने समान असल्यास, जिच्यामध्ये संबंधित उमेदवारांना समान मते असतील अशा, मतमोजणीच्या पहिल्या फेरीमध्ये अधिकतम मते असलेल्या उमेदवारास दिलेला अपूर्णांकाचा भाग सर्वात मोठा असल्याचे मानण्यात येईल. अशा उमेदवारांस दिलेल्या मतांची संख्या मतमोजणीच्या सर्व फेऱ्यांमध्ये समान असल्यास, निवडणूक अधिकारी चिठ्ठया टाकून, कोणत्या अपूर्णांकाचा भाग मोठा मानावा हे ठरवील.

(तेरा) प्रत्येक उपगठ्ठयातून हस्तांतरित केल्या जाणाऱ्या विशिष्ट मतपत्रिका या उपगठ्ठयात शेवटी दाखल केलेल्या मतपत्रिका असतील आणि अशाप्रकारे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या प्रत्येक मतपत्रिकेवर हस्तांतर केल्याची फेरी दर्शविणारी खूण करण्यात येईल.

(चौदा) मतमोजणीच्या कोणत्याही फेरी अखेर, कोणत्याही उमेदवाराकडे अधिकची मते नसतील किंवा अस्तित्वात असलेली कोणतीही अधिकची मते हस्तांतरित करावयाची गरज नसेल आणि हस्तांतरित केली नसतील आणि एक किंवा अधिक रिक्त जागा भरावयाच्या राहिल्या असतील तर, निवडणूक अधिकारी, मतमोजणीतील सर्वात खालचा उमेदवार निवडणुकीतून वगळील.

(पंधरा) मतमोजणीच्या कोणत्याही फेरीमध्ये सर्वात खालच्या दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांना, हस्तांतरित करण्यात न आलेल्या कोणत्याही अधिक मतांसह, मिळालेली एकूण मते ही, पुढील उच्चतम उमेदवाराला दिलेल्या मतांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास, निवडणूक अधिकारी अशा मतमोजणीच्या फेरीत उपरोक्त सर्वात खालच्या दोन किंवा त्याहून अधिक उमेदवारांस वगळील :

परंतु, या उमेदवारांच्या वगळणुकीमुळे निरंतर उमेदवारांची संख्या, भरावयाच्या शिल्लक रिक्त जागांच्या संख्येपेक्षा कमी करता येणार नाही.

(सोळा) मतमोजणीमध्ये दोन किंवा अधिक उमेदवारांस, प्रत्येकास समान व सर्वात कमी मतसंख्या असल्यास, जिच्यामध्ये त्या उमेदवारांची मते असमान असतील असा प्रथम मतमोजणीच्या फेरीमध्ये सर्वात कमी मतसंख्या असलेले उमेदवार वगळण्यात येतील आणि जर या उमेदवारांकडे जमा झालेल्या मतांची संख्या सर्व मतमोजणीच्या फेऱ्यांमध्ये समान असल्यास, निवडणूक अधिकारी चिठ्ठया काढील आणि ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी काढण्यात येईल, त्याला वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(सतरा) कोणताही उमेदवार वगळण्यात आल्यास, निवडणूक अधिकारी, यात यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त त्या उमेदवारास दिलेल्या सर्व मतपत्रिकांची तपासणी करील आणि,–

(क) निरंतर उमदेवारांसाठी हस्तांतरणीय मतपत्रिका,त्यांवर नोंद केलेल्या पसंतीक्रमानुसार उपगठ्ठयात वेगळ्या करील;

(ख) प्रत्येक उपगठ्ठा ज्या उमेदवाराचा पसंतीक्रम नोंदवलेला असेल त्याला हस्तांतरित करील; आणि

(ग) अहस्तांतरणीय मतपत्रिकांचा स्वतंत्र उपगठ्ठा बाजूला ठेवील.

(२१) मतमोजणीच्या कोणत्याही फेरी अखेरीस, निवड झालेल्या उमेदवारांची संख्या भरावयाच्या रिक्त जागांच्या संख्येशी समान असल्यास, मतांचे आणखी हस्तांतरण करण्यात येणार नाही.

(२२) एक किंवा अनेक उमेदवार वगळल्यानंतर, तेव्हाच्या निरंतर उमेदवारांची संख्या, न भरलेल्या रिक्त जागांशी समान असल्यास, असे निरंतर उमेदवार त्यानंतर निवडून येतील आणि मतांचे आणखी हस्तांतरण करण्यात येणार नाही.

(२३) निवडून आलेल्या उमेदवारांचा निवडणुकीतील प्राधान्यक्रम, ते जसजसे पृथकपणे निवडून येतील त्या क्रमानुसार असेल. मतमोजणीच्या कोणत्याही फेरीअखेर दोन किंवा त्याहून अधिक उमेदवार निवडून आल्यास, त्यांचा प्राधान्यक्रम हा उमेदवारांस मिळालेल्या मतसंख्येनुसार उच्चतम संख्येपासून उतरत्या क्रमाने असेल. दोन किंवा अधिक उमेदवारांना दिलेल्या मतांची संख्या समान असेल, किंवा उमेदवारांची बिनविरोध निवड झाली असेल तर, निवडीचा प्राधान्यक्रम आद्याक्षरानुसार असेल.

(२४) जेव्हा कोणतेही हस्तांतरण केलेले असेल तेव्हा, अशा हस्तांतरित केलेल्या मतपत्रिकांचा प्रत्येक उपगठ्ठा, ज्या उमेदवारास हस्तांतरण करण्यात आले असेल त्या उमेदवारास मिळालेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठयात असल्यास, सर्वात वर ठेवण्यात येईल आणि अशा उमेदवारास हस्तांतरित केलेल्या मतपत्रिकांच्या संख्येएवढी मते देण्यात येतील.

(२५) निवडून आलेल्या उमेदवारास निवडून येण्यासाठी आवश्यक असू शकतील अशी अधिकची हस्तांतरणीय मते वगळता एरव्ही, अहस्तांतरणीय मतपत्रिकांचा स्वतंत्र गठ्ठा करून तो अगोदरच बाजूला काढलेल्या अहस्तांतरणीय मतपत्रिकांच्या कोणत्याही गठ्ठयाबरोबर ठेवण्यात येईल.

(२६) निवडून आलेल्या उमेदवारांच्या अधिकच्या मतांचे हस्तांतरण केल्यानंतर, निरंतर उमेदवारांना हस्तांतरित न केलेल्या आणि पूर्ववर्ती खंडात तरतूद केल्याप्रमाणे बाजूस काढून न ठेवलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठयामध्ये, निवडून आलेल्या उमेदवारासाठीची आवश्यक मते (कोटा) म्हणून एकत्र ठेवण्यात येतील आणि सदर गठ्ठा निवडून आलेल्या उमेदवारांच्या नावाने चिन्हांकित करण्यात येईल.

(२७) **निवडणुकीचा निकाल.**— (एक) छाननी आणि मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक अधिकारी, त्याबाबतचा निकाल अनुक्रमे प्राचार्य व कुलगुरुला तात्काळ कळवील.

(दोन) उपरोक्त नमूद केल्यानुसार निवडणुकीचा निकाल कळविण्यात आल्यानंतर, प्रत्येक उमेदवाराच्या मतमोजणीचा निकाल, प्रथम पसंतीक्रमाच्या मिळालेल्या मतांची संख्या आणि उमेदवाराला वगळण्यात येईपर्यंत किंवा तो निवडून येईपर्यंत त्या संख्येत केलेली त्यानंतरच्या मतांची बेरीज किंवा वजाबाकी निवडणूक अधिकारी घोषित करील. अंतिम निकाल तयार झाल्यानंतर लगेच, मतपत्रिका पाकिटामध्ये मोहोरबंद करून एक किंवा त्यापेक्षा जास्त परिनिरिक्षकांकडून साक्षांकित केल्या जातील आणि मतपत्रिकांची विल्हेवाट लावेपर्यंत महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या बाबतीत प्राचार्यांकडे आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद, विद्यापीठ विद्यार्थी विभाग यांच्याबाबतीत कुलसचिवांच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्यासाठी देण्यात येतील.

९. **आचारसंहिता.**—(१) निवडणुकीच्या प्रयोजनार्थ कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही प्रकारचे उमेदवारांचे पॅनल तयार करण्यात येणार नाही.

(२) वर्ग प्रतिनिधीच्या निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवारामागे जास्तीत जास्त रुपये १,००० आणि अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी यांच्या निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवारामागे जास्तीत जास्त रुपये ५,००० इतका खर्च अनुज्ञेय असेल.

(३) प्रत्येक उमेदवारास निकाल घोषित झाल्यापासून दोन आठवड्यांच्या आत, अनुक्रमाने क्रमांक दिलेल्या प्रमाणकांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह, या आदेशासोबत जोडलेल्या नमुना 'ब' मधील खर्चाचे स्वसाक्षांकित विवरणपत्र निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करावे लागेल.

(४) कोणताही उमेदवार निवडणूक मोहिमेदरम्यान कोणताही धर्म किंवा जात किंवा सामाजिक संघटना किंवा व्यक्ती यांसह कोणत्याही राजकीय पक्षाचे, इतर संघटनेचे व इतर कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही चिन्ह किंवा बोधचिन्ह किंवा छायाचित्र किंवा प्रतिमा यांचा वापर करणार नाही.

(५) कोणत्याही उमेदवारास निवडणूक मोहिमेदरम्यान महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आवारात मिरवणूक काढण्यास किंवा मेळावा घेण्यास परवानगी असणार नाही.

(६) मतदानाच्या दिवशी त्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या वैध ओळखपत्राशिवाय त्या महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आवारात प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल.

(७) महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आवारात निवडणूक मोहिमेच्या प्रयोजनार्थ जनतेस संबोधणारी यंत्रणा आणि वाहने आणि इतर कोणतीही वाहतुकीची साधने याच्या वापरास सक्त मनाई असेल.

(८) निवडणूक अधिकारी, उमेदवारांना त्यांच्या भित्तपत्रकांसाठी वापर करता येईल, अशी आवारातील विशिष्ट दर्शनी ठिकाणे सूचित करील. निवडणूक अधिकारी अशा विशिष्ट दर्शनी ठिकाणांवरील जागेच्या उमेदवारांना करावयाच्या वाटपाबाबत निर्णय घेईल. भित्तपत्रकाचा आकार आणि नमुना निवडणूक अधिकाऱ्याकडून ठरविण्यात येईल.

(९) कोणताही उमेदवार ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या गटांमधील मतभेद विकोपास जातील किंवा परस्पर द्वेष, शत्रूत्व आणि तणाव निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही किंवा त्यात सहभागी होणार नाही.

(१०) उमेदवार किंवा त्याचा समर्थक महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा विद्यापीठ यांची मालमत्ता, जी कोणतीही पद्धत असेल त्या पद्धतीने विरूपित करणार नाही किंवा ती नष्ट करण्याची व्यवस्था करणार नाही.

(११) निवडणुकीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये, महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आवारात आणि मतदान केंद्रामध्ये कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस प्रवेश करण्यास काटेकोरपणे मनाई करण्यात येईल.

(१२) प्रत्येक उमेदवार, निवडणूक प्रक्रियेदरम्यान महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या परिसरात शांतता व सलोखा राखण्याकरिता प्राधिकरणाला स्वंयप्रेरणेने मदत आणि सहाय्य करील.

(१३) कोणत्याही उमेदवाराकडून आचारसंहितेच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाल्यास, निवडणूक अधिकारी, त्या उमेदवारावर उचित शिस्तभंगाची कार्यवाही करील. त्याचबरोबर त्याची उमेदवारी रद्द करील. या प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी, व्यथित व्यक्तीस, आपले म्हणणे मांडण्याची योग्य संधी देण्यात येईल.

(१४) 'निवडणुकीशी संबंधित अपराध' या संबंधातील भारतीय दंड संहितेच्या तरतुदी ह्या, विद्यार्थी निवडणुकीकरिता लागू असतील. आक्षेपार्ह घटना या कथित अपराध घडल्यानंतर, प्रकरण नोंदविण्यासाठी, बारा तासाच्या आत पोलिसांना कळविण्यात याव्यात.

(१५) निवडणूक प्रक्रियेदरम्यान महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा विद्यापीठ यांचे सर्व अध्यापक व अध्यापनेतर कर्मचारी यांनी निवडणूक अधिकाऱ्याने नेमून दिलेले कोणतेही काम, जबाबदारी पार पाडणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

१०. **तक्रार निवारण यंत्रणा.**—(१) व्यथित विद्यार्थ्यास किंवा उमेदवारास, निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या विरोधात, तक्रारीचे निवारण करण्याकरिता तक्रार निवारण प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज, अभिकथित तक्रार केल्यापासून अठ्ठेचाळीस तासाच्या आत दाखल करता येईल.

(३) तक्रार निवारण प्राधिकरण पुढीलप्रमाणे असेल :—

(क) महाविद्यालयातील किंवा परिसंस्थेतील वर्ग प्रतिनिधी, अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी आणि राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यांच्या निवडणुकीशी संबंधित विवाद किंवा तक्रार याच्या बाबतीत महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा संस्थेचा संचालक ;

(ख) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद यामधील वर्गप्रतिनिधी, अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी, राखीव प्रवर्गातील प्रतिनिधी यांच्या निवडणुकीच्या संबंधात विवाद किंवा तक्रार यांच्या बाबतीत विद्यापीठाचा प्र.कुलगुरू.

(४) तक्रार निवारण प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व तो संबंधित पक्षकारांवर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

द. रा. कहार,
शासनाचे उप सचिव.

नमुना 'अ'

नामनिर्देशन नमुना

(परिच्छेद ८ (८) पहा)

*(जे लागू नसेल ते खोडावे)

*** महाविद्यालय विद्यार्थी परिषद /**

*** विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद /**

*** विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणूक**

महाविद्यालयाचे/विद्यापीठ विभागाचे / विद्यापीठाचे नाव.	
ज्या पदासाठी उमेदवार निवडणूक लढवत आहे त्या पदाचे नाव	*अध्यक्ष / सचिव / महिला प्रतिनिधी / राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी (————)
उमेदवाराचे नाव (मोठ्या अक्षरात)	आडनाव पहिले नाव वडिलांचे / पतीचे नाव
संबंधित विद्यार्थी परिषदेच्या निर्वाचक गण यादीतील अनुक्रमांक	
वर्ग, तुकडी व शैक्षणिक वर्ष	वर्ग ———— तुकडी———— पूर्णवेळ पाठ्यक्रम : *होय / नाही शैक्षणिक वर्ष ————
जन्मतारीख व वय (शाळा सोडल्याचा दाखला/स्थानांतरण प्रमाणपत्र याची छायाप्रत सोबत जोडावी)	जन्मतारीख : / / वय : वर्षे
मागील वर्षी उत्तीर्ण झाल्याची टक्केवारी (गुणपत्रिकेची छायाप्रत सोबत जोडावी)	———— ———— पैकी मिळालेले एकूण गूण ———— टक्केवारी ————
